# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४२** **(महासभा)**

**विषय क्र.:- ०१** **प्रशासक ठराव क्र.:- ३१९** **दिनांक :-१६/०९/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश

२. दि.१९/०८/२०२५ मंगळवार रोजी सकाळी—११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.४१ चे कार्यवृत्त कायम करणे.

**विषय :-** दि.१९/०८/२०२५ मंगळवार रोजी सकाळी—११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.४१ चे कार्यवृत्त कायम करणे.

वाचा क्र.१ व २ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

दि.१९/०८/२०२५ मंगळवार रोजी सकाळी—११.३० वाजता संपन्न झालेल्या सभा क्र.४१ चे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यात येत आहे.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

## MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४२** **(महासभा)**

**विषय क्र.:-०२** **प्रशासक ठराव क्र :-३२०** **दिनांक :-१६/०९/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. विदयुत विभाग प्रमुख यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./मनपा/ विदयुत/१९४/२०२५-२६ दि.२८/०८/२०२५
३. शहर अभियंता यांचा दि.३०/०७/२०२५ चा अभिप्राय.
४. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.१९/०८/२०२५ चा अभिप्राय.
५. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.०४/०८/२०२५ चा अभिप्राय.
६. आयुक्त यांचा दि.१९/०८/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** जळगांव शहरातील एलईडी पथदिव्यांची वार्षीक देखभाल व दुरुस्ती कामी मक्तेदार यांचेकडुन काम करुन घेणेसाठी अंदाजीत रक्कम रु.४४,९०,८९२/- मात्रची निविदा प्रसिध्द करणेस मान्यता मिळणेबाबत.बाबत.

वाचा क्र.१ व विदयुत विभाग प्रमुख यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

ईईएसएलमार्फत जळगांव शहरात एस्क्रो तत्वावर एलईडी पथदिवे बसविणे कामी ईईएसएल कंपनीस मनपा/कार्या/विद्युत/क्र.३३ दि.२९/११/२०१८ अन्वये कार्यादेश निर्गमीत करण्यात आलेला होता. त्या अनुषंगाने ईईएसएल कंपनीने एलईडी पथदिवे बसविण्याचे काम पूर्ण केलेले होते.

सद्यस्थितीत ईईएसएलमार्फत १७३२८ +४९३ एकूण १७८२१ नग एलईडी पथदिवे बसविण्यात आलेले असून त्यानुसार खालीलप्रमाणे वार्षीक देखभाल दुरुस्ती कामी ईईएसएलमार्फत मुळ देयकात देखभाल दुरुस्ती बाबत खालीलप्रमाणे आकारणी होत आहे.

| Financial Calculation for Replacement of Conventional Streetlight With LED Streetlight at Jalgaon | | |
|---|---|---|
| Sr.No | EESL Financial Sheet | Detail From JCMC |
| 1 | Maintenance cost of light @17821 per point for 7 years-252 | ईईएसएलने त्यांच्या स्तरावर निविदा प्रसिध्द करुन मक्तेदारामार्फत सदर दरानुसार काम करण्यात आले बाबतचा ईईएसएल नियुक्त मक्तेदार दक्ष इलेक्ट्रीकल हरीयाणा यांच्या करारपत्रात दर देण्यात आलेला होता. |

ईईएसएल ने बिलाचे वर्गीकरण तक्त्यातील मुद्या क्रं. १ अन्वये Maintenance cost of light per point नुसार रक्कम रु.२५२/- मात्र एकुण एलईडी पथदिवे १७३२८ याप्रमाणे २५२ x १७३२८= ४३.६६.६५६/- मात्र प्रतिवर्ष आकारणी करीत आहे. तसेच प्रति महिना रक्कम रु. ३.६३.८८८/- मात्र म्हणजेच प्रति फिक्चर रक्कम रु. २१/- मात्र प्रमाणे आकारणी करीत आहे. परंतु ईईएसएल कंपनीने माहे सप्टेंबर २०२३ पासून EESL/MH/SLNP/२०२३-२०२४/Intimation Notice/००२/६३७७/Dt.२५/८/२०२३-२०२४ अन्वये एलईडी पथदिवे देखभाल दुरुस्तीचे कामे बंद केलेली असल्याने महानगरपालिकेने त्यानंतर ईईएसएल कंपनीस कुठलेही देयक अदा केलेले नाही.

सद्यस्थितीत ईईएसएलमार्फत १७३२८+ ४९३ एकुण १७८२१ नग एलईडी पथदिवे बसविण्यात आलेले आहेत. त्यानुसार खालीलप्रमाणे वार्षीक देखभाल दुरुस्ती कामी ईईएसएलमार्फत मुळ देयकात देखभाल दुरुस्ती बाबत खालीलप्रमाणे आकारणी होत आहे.

| अ.क्रं. | ईईएसएल कंपनीमार्फत एलईडी पथदिवे देखभाल दुरुस्ती खर्च |
|---|---|
| १ | एलईडी संख्या १७८२१ |
| २ | प्रति नग वार्षिक दुरुस्ती खर्च रक्कम रु. २५२/- |
| ३ | प्रति नग दरमहा दुरुस्ती खर्च रक्कम रु. २१/- |
| ४ | दरमहा खर्च २१ X १७८२१ = ३,७४,२४१/- |
| ५ | वार्षिक खर्च २५२ x १७८२१ = ४४,९०,८९२/- |

जळगाव शहरातील ईईएसएल कंपनीमार्फत बसविण्यात आलेले एकुण १७८२१ एलईडी पथदिवे संपुर्णपणे देखभाल दुरुस्ती करणे कामी ईईएसएल कंपनीचे दरानुसार एकुण रक्कम रु. ४४,९०,८९२/-मात्रचा वार्षिक खर्च अपेक्षित आहे.

सदय स्थितीत जळगांव शहरातील प्रभागांमध्ये ईईएसएल मार्फत बसविण्यात आलेले एलईडी वगळुन मा.आ.श्री. सुरेश दामु भोळे व मा.आ.श्री. चंदुभाई पटेल यांचे आमदार स्थानिक विकास कार्यक्रम अंतर्गत तसेच नागरी दलितेत्तर सुधारणा योजना, नगरोत्थान व इतर योजना तसेच मनपा मार्फत जळगांव शहरात विविध ठिकाणी ९ मीटर उंचीचे मिनी हायमास्ट पोल तसेच शहरातील सार्व. शौचालय ठिकाणी पोल उभारुन त्यावर विविध क्षमतेचे एल. ई. डी. पथदिवे बसवुन प्रकाश व्यवस्था करण्यात आलेली आहे.

शहरात अंधाराअभावी नागरिकांची गैरसोय होऊ नये याकरीता शहरातील बंद एल.ई.डी. पथदिवे कार्यान्वीत करणे कामी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षाकरिता पथदिवे व्यवस्था दुरुस्तीच्या वार्षिक (मार्च २०२३ पावेतो) एल.ई.डी. पथदिवे दुरुस्ती करणे कामी बाजारभावानुसारच्या दरापेक्षा ड्रायव्हरचा दर जिल्हा दर सूचीनुसार जास्तीचा असल्याने सदर कामा बाबतचा दर बाजार भावानुसार घेण्यात आलेला आहे. तसेच PCB च्या दराचा समावेश जिल्हा दरसूचीत नसल्याने सदरचा दर बाजार भावानुसार घेण्यात आलेला आहे. त्यानुसार खालीलप्रमाणे दर्शविल्यानुसार एलईडी पथदिवे देखभाल दुरुस्तीचे काम महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

| अ.क्रं. | साहित्याचे वर्णन | LED पथदिवे दुरुस्ती करावयाची वार्षीक अंदाजीत संख्या | बाजारभावानुसार प्रती नग दर | एकुण खर्च |
|---|---|---|---|---|
| १ | २४/४८ वॅट एल.ई.डी MOUNTED PCB बदलविणे (जॉबवर्क) | ५० | ५७५.०० | २८७५०,०० |
| २ | २४/४८ वॅट एल.ई.डी POWER SUPPLY DRIVER बदलविणे (जॉबवर्क) | ५० | ६००.०० | ३००००.०० |
| ३ | ५०/८० वॅट एल.ई.डी MOUNTED PCB बदलविणे (जॉबवर्क) | २५० | ८५०.०० | २१२५००.०० |
| ४ | ५०/८० वॅट एल.ई.डी POWER SUPPLY DRIVER बदलविणे (जॉबवर्क) | २५० | ११००.०० | २७५००० |
| ५ | ८०/१५० वॅट फ्लड लाईट MOUNTED PCB बदलविणे (जॉबवर्क) | १० | ११२५.०० | ११२५०.०० |
| ६ | ८०/१५० वॅट फ्लड लाईट POWER SUPPLY DRIVER बदलविणे (जॉबवर्क) | १० | २१५०.०० | २१५००.०० |
| | | | एकुण रक्कम रु. | ५७९०००.०० |

वर दर्शविल्याप्रमाणे एकूण ६०० नग फिक्चर दुरुस्त करावयाचे झाल्यास एकूण रक्कम रु. ५,७९,०००/- मात्र खर्च मनपा सद्य स्थितीत करीत आहे. ईईएसएलमार्फत बसविण्यात आलेल्या एलईडीची संख्या १७८३१ नग असल्याने वरीलप्रमाणे खर्च केल्यास सदरचा खर्च मनपास परवडणारा नाही.

महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग यांचेकडील शासन निर्णय क्र. पदिवे-२०२५/प्र.क्र.१८३/नवि-२० दि.२५ जुलै २०२५ अन्वये राज्यातील सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रात एनर्जी इफिशिएन्सी सर्विसेस लिमिटेड म्हणजेच ईईएसएलच्या माध्यमातुन एलईडी पथदिवे बसविण्यासाठी नगर विकास विभागामार्फत दि. १४/०२/२०१८ रोजी एस्क्रो तत्वावर ईईएलसोबत ७ वर्षासाठी करण्यात आलेल्या करारनाम्याचा कालावधी दि.१३/०२/२०२५ रोजी संपला असल्याने तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ४९ (२) (अ) नुसार नागरी स्थानिक स्वराज्य संस्था क्षेत्रातील दिवाबत्ती / पथदिवे यांची व्यवस्था करणे हे महानगरपालिका / नगरपालिका / नगरपंचायत यांचे मुलभूत कर्तव्य आहे. नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेमार्फत पथदिव्यांची व्यवस्था करणे हा त्यांच्या मूलभूत सेवेचा महत्वाचा भाग आहे. राज्यातील पथदिवे यंत्रणा प्रभावीपणे कार्यान्वीत राहण्यासाठी पथदिवे यंत्रणेच्या दरांमध्ये व कामाच्या दर्जामध्ये एक सुत्रता व किफायतशीरता असणे आवश्यक आहे. या करीता राज्यात एक एजन्सी निश्चित करण्यासाठी आयुक्त तथा संचालक नगरपरिषद प्रशासन संचालनालय यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात येत आहे. समितीच्या मान्यतेने सदर निविदेद्वारे अंतिम होणा-या निविदाधारकासोबत तपशीलवार बाबी (Specification) व या दरानुसार स्वतंत्रपणे करारनामे करुन त्यानुसार कार्यवाही करणे सर्व ड वर्ग महानगरपालिका व सर्व नगरपालिका/नगरपंचायती यांना बंधनकारक राहील. असे शासन निर्णयात नमूद केलेले आहे. परंतु सदरचे प्रक्रियेस काही कालावधी लागू शकतो. ईईएसएल कंपनीने शहरातील एलईडी पथदिवे देखभाल व दुरुस्तीची कामे बंद केलेले असून शासन निर्णयानुसार नव्याने एजन्सी निश्चित करणेचा अवधी बघता शहरातील एलईडी पथदिवे व्यवस्था दुरुस्ती करणे हे महानगरपालिकेस आवश्यक आहे.

जळगांव शहरामध्ये येत्या काही दिवसांत महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक होणार आहे. तसेच येत्या काही दिवसांत श्री गणेश उत्सव, श्री दुर्गादेवी उत्सव, दसरा, दिवाळी या सारखे सार्वजनिक उत्सव साजरे होणार आहे. मात्र ईईएसएल कंपनीने एलईडी पथदिव्यांची देखभाल व दुरुस्तीची कामे बंद केलेले असल्याने तसेच शहरात ब-याच ठिकाणी सिसिएमएस यंत्रणा बंद असल्याने शहरातील ब-याच भागातील पथदिवे बंद आहेत. इतर विविध परिसरातील नागरीकांच्या पथदिवे बंद असलेबाबतच्या तक्रारीमध्ये वाढ झालेली आहे. बंद एलईडी पथदिव्यामुळे अपघात होणे, चोरी होणे तसेच ईईएसएल कंपनीने बंद केलेल्या कामांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न उद्दभवण्याची दाट शक्यता आहे.

तरी वर नमुद केलेप्रमाणे जळगांव शहरातील ईईएसएल कंपनीमार्फत बसविण्यात आलेले एकुण १७८२१ एलईडी पथदिवे संपुर्णपणे देखभाल दुरुस्ती करणे कामी ईईएसएल कंपनीचे दरानुसार एकुण रक्कम रु.४४,९०,८९२/-मात्रचा वार्षीक खर्च अपेक्षित आहे.

प्रस्तृत कामी मक्तेदाराने स्वताःचे मनुष्यबळ वापरुन एलईडी पथदिवे दुरुस्ती कामी लागणा-या MOUNTED PCB POWER SUPPLY DRIVER इतर अनुषंगीक खर्च प्रति नगानुसार नादुरुस्त एलईडी पथदिवे दुरुस्ती करुन पुनश्चः पोलवर बसवून देणे कामी दरमहा प्रति नग रु.२१/- मात्र याप्रमाणे (१ नग एलईडी पथदिवे वार्षीक रक्कम रु. २५२ x १७८२१ एलईडी पथदिवे = रक्कम रु. ४४,९०,८९२) मात्रचे खर्चास प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेस व ई निविदा प्रक्रिया राबविणेस महासभा/प्रशासक यांची मान्यता मिळणेस सादर, सदर कामाचा खर्च हा सन २०२५-२६ अंतर्गत लाईट व्यवस्था व दुरुस्ती या लेखाशीर्षाखाली करण्यात येईल.

त्यानुसार उक्त कामाचे अंदाजपत्रकास मान्यता मिळणेस व ई निविदा प्रक्रिया राबविणे कामी महासभा/प्रशासक यांची मान्यता मिळणेसाठी विदयुत विभाग प्रमुख यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**जळगाव शहर महानगरपालिका जळगाव**
महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०
**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**
Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.४२** **(महासभा)**

**विषय क्र.:-०३** **प्रशासक ठराव क्र :-३२१** **दिनांक :-१६/०९/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. भांडारपाल, भांडार विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./भांडार/१०३/२०२५-२६ दि.११/०९/२०२५
३. भांडारपाल, भांडार विभाग यांचा दि.०९/०९/२०२५ चा अभिप्राय.
४. उपायुक्त यांचा दि.११/०९/२०२५ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.११/०९/२०२५ चा अभिप्राय.
६. आयुक्त यांचा दि.११/०९/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिके अंतर्गत अग्निशमन विभागाकरीता साहित्य व उपकरणे पुरवठा करणेबाबत.

वाचा क्र.१ व भांडारपाल, भांडार विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका अग्निशमन सेवा अत्यावश्यक सेवा असल्याने सदर विभागाकरीता खालील प्रमाणे अत्याधुनिक साहित्य व उपकरणे खरेदी करणेकामी सहाय्यक आयुक्त यांच्या मार्फत प्रस्ताव (मागणी) प्राप्त झाला आहे.

| अ.क्रं. | साहित्य व उपकरणांचे नांव | संख्या |
|---|---|---|
| १ | इन्फान्टेबल रबर बोट (८ सिट कॅपिसिटी) | ०१ नग |
| २ | ४० HP सुझुकी आऊटबोर्ड मोटर, ०२ स्ट्रोक | ०१ नग |
| ३ | स्मोक एक्सॉस्टर (बॅटरी पॉवर) | ०४ नग |
| ४ | B.A. सेट कॉम्प्रेसर | ०१ नग |
| ५ | वुड कटर बॅटरी पॉवर विथ चार्जर (बिग साईज) | ०७ नग |
| ६ | फायरमन प्रॉक्सीमिटी सुट | १० नग |
| ७ | AFFF Foam (२० लिटर कॅन) | ५०० लिटर |

उपरोक्त साहित्य खरेदी करणेकामी निविदा GEM Portal वर प्रसिध्द करणे व अग्निशमन अधिकारी यांच्या अभिप्रायनुसार व त्या करीता येणाऱ्या अंदाजीत खर्च रक्कम रु. ३४ लक्ष मात्र आग सुरक्षा निधी या लेखाशिर्षा खाली करणेस मान्यता मिळणेसाठी भांडारपाल, भांडार विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४२** (महासभा)

**विषय क्र.:-०४** **प्रशासक ठराव क्र :-३२२** **दिनांक :-१६/०९/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. भांडारपाल, भांडार विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./भांडार/१०४/२०२५-२६ दि.११/०९/२०२५
३. भांडारपाल, भांडार विभाग यांचा दि.०८/०९/२०२५ चा अभिप्राय.
४. उपायुक्त यांचा दि.०९/०९/२०२५ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.१०/०९/२०२५ चा अभिप्राय.
६. आयुक्त यांचा अभिप्राय.

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिके अंतर्गत असणाऱ्या सर्व हेल्थ पोस्ट येथे औषधी व इतर साहित्यांचा वार्षीक मंजुर दराने पुरवठा करणेबाबत.

वाचा क्र.१ व भांडारपाल, भांडार विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

जळगांव शहर महानगरपालिका, जळगांव शहर महानगरपालिके अंतर्गत येणाऱ्या सर्व दवाखाने हेल्थपोस्ट करीता सन २०२५-२६ या आर्थिक वर्षात सोबत जोडलेल्या यादी नुसार औषधी व इत्यादी साहित्य पुरवठा करणेकामी प्रमुख वैद्यकीय अधिकारी यांची मागणी प्राप्त झाली आहे.

खालील तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे औषधी व इतर साहित्य खरेदी करणेबाबतची ई-निविदा http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करणेस व त्या करीता येणाऱ्या अंदाजीत रक्कम रु. ४५ लक्ष मात्रच्या खर्च औषधी, उपकरणे, रसायने इत्यादी या लेखाशिर्षा खाली करणेस मान्यता मिळणेसाठी भांडारपाल, भांडार विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

**दवाखाने विभागाला लागणारी औषधी / इतर साहित्य**

| Sr.No. | Name | Packing / Demand |
|---|---|---|
| 1 | Tab. Paracetamol IP 500.mg. | 1000 x 172 pkt |
| 2 | Tab Chlorpheneramine maleate - 4 mg. | 1000×168 pkt |
| 3 | Tab Prochoperazine Maleate MD | 10×1250 Strip |
| 4 | Tab. Antacid IP/Gelusi Mps | 1000×110 pkt |
| 5 | Tab. Cyclopam /Anti spasmodic | 10×2600Strip |
| 6 | Tab. Fluconazole | 10×740 Strip |
| 7 | Tab. Diclofenac Sodium 50mg | 10×3350 Strip |
| 8 | Tab Furazolidone | 10 x 1350 Strip |
| 9 | Tab. Ibuprofen 400mg | 10 x 1970 pkt |
| 10 | Tab. Azithromoycin Mono.250mg | 6 x 20 x 179 |
| 11 | Tab. Azithromoycin Mono.500mg | 3 x 30 x 245 |
| 12 | Tab Amoxycillin250 D.T. | 10 x 3500 Strip |
| 13 | Tab Pentaprozole 40mg | 10 x 10 x 180 |
| 14 | Tab.Folic Acid 5mg | 1000 x 142 |
| 15 | Tab Tinidazole 300mg | 10 x 1080Strip |
| 16 | Tab./Cap B-Complex | 10 x 3850 Strips |

| | | |
|---|---|---|
| 17 | Tab Norflox400 mg | 10 x 1010Strip |
| 18 | Tab Ciprofloxacin 500 mg | 10 x 1450Strip |
| 19 | Tab Ofloxacin 200mg | 10 x 2750Strip |
| 20 | Tab Amox.+Clavulanic Acid 625mg | 10 x 10 x 165 |
| 21 | Tab Ferrus Sulphate (large) | 1000 x 267 pkt |
| 22 | Tab Calcium+Vit.D3 | 15 x 10 x 1817 strip |
| 23 | Tab Ranitidine | 15 x 1400 strip |
| 24 | Tab Cefixime 200mg | 10 x 10 x 182 Strips |
| 25 | Tab Ofloxacin+Ornidazole | 10 x 10 x 85 |
| 26 | Tab Zinc With Vit.C | 10 x 10 x 310 Strips |
| 27 | Tab Metranidazole 400mg | 10 x 10 x 75 |
| 28 | Tab Ondanestron | 10 x 10 x 80 |
| 29 | Cap Amoxycillin 500mg | 10 x 10 x 35 |
| 30 | Tab Trimetho.+ Sulpha-DS | 10 x 400 Strip |
| 31 | Tab cetirizine | 10 x 10 x 50 |
| 32 | Tab Femiplex | 75 x 25 Bott. |
| 33 | Tab Livomyn | 500 x 40 Box |
| 34 | Tab Chloroquine Phosphate | 10 x 80 |
| 35 | Tab Dulcolax | 10 x 40 |
| 36 | Tab Deriphylline | 10 x 140 Strips |
| 37 | Tab.Amox.+Clavulanic Acid 325mg | 10x100 |
| 38 | IV NS | 500ml x 5 |
| 39 | IV RL | 500ml x 55 |
| 40 | IV DNS | 500ml x 40 |
| 41 | IV- D 5 % | 500ml x 40 |
| 42 | inj Deriphylline | 2ml x 50 |
| 43 | inj Gentamycin | 30ml x 400 |
| 44 | inj Diclofenac Sodium | 30 ml x 4260 Vials |
| 45 | Inj Metocholopromide | 30 ml x 33 Vials |
| 46 | Inj.T.T | .5ml x 2270 amp |
| 47 | Inj. B-Complex | 30 ml x 304 Vials |
| 48 | inj Pheniramine Maleate | 30 ml x 82 Vials |
| 49 | Inj Dexamethasone | 30 ml x 61 Vials |
| 50 | Inj.A.R.V (Rabies Inj.) | 1000 Dose |
| 51 | Disp. Syringe 2 ml | 100x217 box |
| 52 | Hydrogen Peroxide | 450 ml x 56 Bottle |
| 53 | Sticking Roll | 121 Roll |
| 54 | Glycerine Borax | 400 ml x 5 Bottle |
| 55 | Nitrofurazone Oint. | 400 ml x 5 Bottle |
| 56 | Sterilium Hand Wash Solution | 400 ml x 10 Bottle |
| 57 | Gention Violet | 400 ml x 10 Bottle |
| 58 | Alkaliser Syrup | 400 ml x 3 Bottle |
| 59 | IV Set | 120 |
| 60 | Scalp Vein Set No 20 | 120 |
| 61 | Phenyl | 5Lit. X 22 Jar |
| 62 | Dettol | 5Lit. X 8 Jar |
| 63 | Dispo.Mask | 100 x 2 Box |
| 64 | Surgical Spirit | 87 Bottle |
| 65 | Povidone Iodine Oint. | 15 gm x 445 Tube |
| 66 | Povidone Iodine Solution | 400ml x 30 Bottle |
| 67 | Ofloxacine+Metro.Suspn. | 30 ml x 720 Bottle |
| 68 | Cetirizine Syrup | 30 ml x 1660 Bottle |

| | | |
|---|---|---|
| 69 | Paracetamol Suspension | 60 ml x 4320 Bott. |
| 70 | Azithromycin Syrup | 15ml x 250 Bottle |
| 71 | Anticold Syrup | 30 ml x 3000 Bottle |
| 72 | Cefixim Dry Syrup | 6110 Bottle |
| 73 | Amox+Clavulanic Acid Syrup | 400 Bottle |
| 74 | Cough Mixture | 4.5 lit x 267 Jar |
| 75 | Gloves No. 6 ½ | 820 pair |
| 76 | Gloves No. 7 | 870 pair |
| 77 | Gentamycin EYE/ ear drop | 5 ml x 570 Bottle |
| 78 | O.R.S Powder 21.5 gm | 25 x 433 |
| 79 | Fluconazole Crem | 1850 Tube |
| 80 | Cotton | 500 gm × 84 pkt |

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४२** **(महासभा)**

**विषय क्र.:-०५** **प्रशासक ठराव क्र :-३२३** **दिनांक :-१६/०९/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./आस्था/१७५८/२०२५-२६ दि.१५/०९/२०२५
३. आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचा दि.११/०९/२०२५ चा अभिप्राय.
४. उपायुक्त यांचा दि.१५/०९/२०२५ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.१५/०९/२०२५ चा अभिप्राय.
६. आयुक्त यांचा दि.१५/०९/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** ज.श.म.न.पा.स आवश्यकतेनुसार विविध विभागांसाठी कुशल, अर्धकुशल कर्मचाऱ्यांची सेवा पुरविणे.

---

वाचा क्र.१ व आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांचा वाचा क्र. २ ते ६ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

ज.श.म.न.पा.स आवश्यकतेनुसार विविध विभागांसाठी कुशल, अर्धकुशल कर्मचाऱ्यांची सेवा पुरविणेकामी निविदा प्रक्रिया राबविली असता जा.क्रं./आस्था/११७२/२०२५-२६ दिनांक २५/०७/२०२५ नुसार दि.२६/०७/२०२५ चे दै.सकाळ या वृत्तपत्रात ई-निविदा सुचना क्रं.०२ E-TENDER NOTICE NO.०२/२०२५ ई निविदा पध्दतीने ऑनलाईन मागविण्यासाठी , महाराष्ट्र शासनाच्या http;//mahatender.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यानुसार खालील प्रमाणे ४ निविदाकारांनी निविदा सादर केलेल्या आहेत. १) रेऑन प्रोटेक्शन प्रा.लि.,जळगांव, २)मानसी लेबर सप्लायर्स,जळगांव, ३)रॅपीड सिक्युरिटी अँड लेबर सप्लायर्स,जळगांव, ४)ओम साई असोसिएटस,नागपूर

प्राप्त झालेल्या निविदाकारांनी सादर केलेली फोल्डर क्रं.१ मधील कागदपत्रांची छाननी केली असता काही कागदपत्रांच्या त्रुटी आढळल्याने पुढील प्रक्रिया राबविणेपुर्वी संबंधित चारही निविदाकारांना कमतरता पत्र (Shortfall Leter) देणेत आलेले होते. त्यानुसार तीन निविदाकारांनी नमुद केलेली कागदपत्रे सादर केलेली होती. त्यानुसार निविदेमधील तरतुदीच्या अनुषंगाने रेऑन प्रोटेक्शन प्रा.लि.जळगांव यांनी कागदपत्रे परिपूर्ण सादर न केल्याने त्यांना सदर निविदा प्रक्रियेतुन अपात्र करण्यांत आलेले होते. निविदा प्रक्रियेत एकुण तीन निविदाकारांच्या निविदा परिपुर्ण असल्याने (दराबाबत) फोल्डर क्रं.२ उघडण्यात आले. उघडण्यात आलेल्या फोल्डर नुसार १)रॅपीड सिक्युरिटी अँड लेबर सप्लायर्स,जळगांव – L१- प्रति कामगार सेवाशुल्क रुपया एक मात्र २)ओम साई असोसिएटस,नागपुर- L१- प्रति कामगार सेवाशुल्क रुपया एक मात्र, ३)मानसी लेबर सप्लायर्स,जळगांव- L२- प्रति कामगार सेवाशुल्क रुपये पाचशे एक मात्र असे दर प्राप्त झाले असल्याने तुलनात्मकदृष्टया समसमान प्राप्त झालेल्या दराच्या अनुषंगाने १)रॅपीड सिक्युरिटी अँड लेबर सप्लायर्स,जळगांव, २)ओम साई असोसिएटस,नागपुर यांना जा.क्रं./आस्था/उका/१६५९ दि.०४/०९/२०२५ नुसार दि.०९/०९/२०२५ रोजी दुपारी ४.०० वाजता सदर बैठकीसाठी उपस्थित राहणेबाबत कळविण्यांत आले होते परंतु कार्यबाहुल्यामुळे सदर बैठक नमुद वेळेत झाली नसल्याने दि.१०/०९/२०२५ रोजी उक्त बैठक झाली. सदर बैठकीस उक्त दोन्हीही निविदाकारांनी दिलेल्या अधिकारपत्राचे अनुषंगाने प्रतिनिधी पाठविले होते व सदर प्रतिनिधींना निविदेबाबत पुढील निर्णय घेण्याचे अधिकार देणेत आलेले होते. सदर उपस्थित प्रतिनिधीपैकी ओम साई असोसिएटस,नागपूर यांचे प्रतिनिधी श्री.गोकुळ नारायण खडसे यांनी सदर निविदा प्रक्रियेतुन माघार घेत असल्याचे लिखीत स्वरुपात पत्र सदर बैठकीत दिलेले होते व रॅपीड सिक्युरिटी अँड लेबर सप्लायर्स,जळगांव यांचे त्या अनुषंगाने दिलेले सेवाशुल्क दर रु.१.०००/-(एक रुपया) स्विकारण्यांत आले.

सन २०२५-२६ करीता जळगांव शहर महानगरपालिकेस आवश्यकतेनुसार विविध विभागांसाठी कुशल, अर्धकुशल कर्मचाऱ्यांची सेवा पुरविणेकामी रॅपीड सिक्युरिटी अँड लेबर सप्लायर्स,जळगांव यांनी दिलेले सेवाशुल्क दर रु.१.०००/-(एक रुपया) स्विकारण्यास तसेच त्यांचेकडुन करारनामा करुन घेणेकामी मान्यता मिळणेसाठी आस्थापना अधिक्षक, आस्थापना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ६ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

**जळगाव शहर महानगरपालिका जळगाव**
महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१
फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०
**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**
Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260

**सभा क्र.४२** **(महासभा)**

**विषय क्र.:-०६** **प्रशासक ठराव क्र :-३२४** **दिनांक :-१६/०९/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./न.र./७४८/२०२५ दि.१२/०९/२०२५
३. रचना सहाय्यक, नगररचना विभाग यांचा दि.२९/०५/२०२५ चा अभिप्राय.
४. सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचा दि.२९/०५/२०२५ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा दि.२९/०५/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** जळगांव शहर महानगरपालिकेच्या बांधकाम परवानगी देण्याकरीता online संगणकीय आज्ञावलीची अंमलबजावणी करणेसाठी प्रशिक्षित कर्मचारी सिस्टीम सर्पोट इंजिनियर म्हणून नियुक्त करणेकामी व दि.०१/०४/२०२५ ते दि.३१/०३/२०२६ या कालावधीसाठी पुढील १२ महिन्या करता ०१ (एक) तांत्रिक कर्मचारी यांना मुदतवाढ मिळणेबाबत.

---

वाचा क्र.१ व सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

शासन नगर विकास विभागाच्या दि.०३/०४/२०१८ च्या निर्णयान्वये ऑनलाईन बिल्डिंग प्लॅन मॅनेजमेंट सिस्टिम राबविणेसाठी प्रधान सचिव, माहिती व तंत्रज्ञान विभाग यांचेकडे ०२ तांत्रिक मनुष्यबळ उपलब्ध करुन देण्याची मागणी करण्यात आली होती. त्यानुसार महा- आय.टी. ने दोन तांत्रिक मनुष्यबळ जळगांव शहर महानगरपालिकेस उपलब्ध करुन दिलेले होते.

तद्नंतर शासन नगर विकास विभागाचे पत्र क्र. टि.पी.एस.-१८१५/५२७/प्र.क्र./१३९/१५/नवि-१३, दि.२१/०१/२०२२ अन्वये सर्व विकास परवानगी प्रस्ताव महा- आय.टी. ने विकसीत केलेल्या BPMS संगणक प्रणालीव्दारे ऑनलाईन स्विकारुन अशा प्रस्तावांना मंजूरी देण्याची कार्यवाही करावी, असे निर्देश दिलेले आहे. त्यानुसार सदर प्रणाली हाताळणेसाठी येणाऱ्या खर्चास महासभेने ठराव क्र.१०९२ दि.२१/०४/२०२३ अन्वये मंजूरी प्रदान केलेली होती.

तथापि, सदरची BPMS संगणक प्रणाली कार्यान्वीत ठेवणेसाठी महासभेने ठराव क्र.१३७ दि.०९/०८/२०२४ अन्वये दि.०१/०४/२०२४ ते दि.३१/०३/२०२५ या कालावधीसाठी ०१ (एक) तांत्रिक कर्मचारी नियुक्त करणेसाठी मान्यता प्रदान केली होती. त्यानुसार महा. आय.टी., मुंबई यांचे मार्फत श्री.राहुल भारत वानखेडे यांना सिस्टीम सर्पोट इंजिनियर म्हणून सदरची BPMS संगणक प्रणाली हाताळणेसाठी नियुक्त करण्यात आले होते. परंतु, दि.०१/०४/२०२४ ते दि.३१/०३/२०२५ या कालावधीसाठी १२ महिन्याचा कार्यकाळ पुर्ण झाल्याने सदर महासभेच्या ठरावाची मंजूरी दि.३१/०३/२०२५ रोजी संपुष्टात आल्याने कामाची निकष पाहता पुनश्च ०१ (एक) तांत्रिक कर्मचारी श्री.राहुल भारत वानखेडे यांची नियुक्ती करणे व दि.०१/०४/२०२५ ते दि.३१/०३/२०२६ या कालावधीसाठी पुढील १२ महिन्याकरीता मुदतवाढ घेणे कामी महा.आय.टी., मुंबई यांना पत्राव्दारे कळविणे उचित होईल.

त्या अनुषंगाने सदरची BPMS संगणक प्रणाली हाताळणेसाठी श्री.राहुल भारत वानखेडे यांना सिस्टीम सर्पोट इंजिनियर म्हणून नियुक्त करणेकामी व दि.०१/०४/२०२५ ते दि.३१/०३/२०२६ या कालावधीसाठी पुढील १२ महिन्या करीता ०१ (एक) तांत्रिक कर्मचारी यांना मुदतवाढ मिळणेसाठी तसेच त्यांचे कडील Proforma Invoice या कार्यालयास सादर करणेबाबत प्रकल्प व्यवस्थापक, महा.आय.टी., मुंबई यांना पत्र देण्यास तसेच, येणाऱ्या पर्यायी खर्चास मान्यता मिळणेसाठी सहाय्यक संचालक, नगररचना विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४२** **(महासभा)**

**विषय क्र.:-०७** **प्रशासक ठराव क्र :-३२५** **दिनांक :-१६/०९/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./ज.श.म.न.पा./पा.पु.वि./१४५/२०२५ दि.१५/०९/२०२५
३. उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचा दि.१८/०८/२०२५ चा अभिप्राय.
४. शहर अभियंता यांचा दि.०८/०९/२०२५ चा अभिप्राय
५. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.०९/०९/२०२५ चा अभिप्राय
६. अतिरिक्त आयुक्त यांचा दि.२१/०८/२०२५ चा अभिप्राय
७. आयुक्त यांचा दि.१०/०९/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** उमाळा जलशुध्दीकरण केंद्र (१३२ MLD) येथे फिल्टर बेड मधील (१० पैकी ५ बेड) फिल्टर मीडिया (सँड) पुरविणे, नवीन टाकणे.

---

वाचा क्र.१ व उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांचा वाचा क्र. २ ते ७ मधील प्रस्तावानूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

उमाळा येथील महानगरपालिकेचे १३२ एम.एल.डी. क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र कार्यान्वित असून या ठिकाणी दररोज सुमारे १०० एम.एल.डी. पाण्याचे शुध्दीकरण करुन शहराला पाणी पुरवठा करण्यात येतो, पाण्याच्या गाळण प्रक्रियेसाठी या केंद्रात एकूण १० सॅड बेडचा वापर करण्यात येतो. सदर सेंड बेडमधील वाळू (फिल्टर मिडिया) वेळोवेळी समतल (लेव्हल) करणे व आवश्यकतेनुसार बदलणे आवश्यक फिल्टर मिडिया दर ५ ते ७ वर्षांनी बदलणे अपेक्षित असते. जलशुध्दीकरण केंद्र सन २००७ पासून कार्यान्वित आहे. सन २०१२ मध्ये फक्त फाईन सँड पुरवून सॅड बेड लेव्हल करण्यात आले होते मात्र आजपर्यंत संपूर्ण फिल्टर मिडिया बदलण्यात आलेला नाही.

सध्या पाण्याच्या गाळण क्षमतेवर परिणाम होऊन शुध्द पाण्याची गाळण क्षमता कमी झाली आहे. पाणी पिवळसर दिसणे, दुर्गंधी येणे यांसारख्या तक्रारी प्राप्त होत असतात. तसेच शहरात वाढीव भागात पाणी पुरवठा करण्यास अडचणी येऊ नये म्हणून सदर काम करणे आवश्यक आहे. पावसाळयात पाण्यातील गढूळपणा (Turbidity) वाढल्यामुळे गाळण प्रक्रिया सक्षम असणे अत्यावश्यक आहे. सध्या सेंड बेड क्रमांक A१ ते A३ पूर्णपणे बंद आहेत. त्यामुळे प्रथम सँड बेड क्रमांक A१ ते A५ मधील फिल्टर मिडिया तात्काळ बदलण्याची गरज आहे. अमृत १ पाणी पुरवठा योजना पूर्ण झालेली असून त्यामध्ये सॅड मिडिया बदलण्याचे काम करण्यात आलेले नाही. सदर कामासाठी नवीन निविदा काढून त्वरित काम करुन घेणे आवश्यक आहे.

या कामासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या २०२३-२४ च्या दरसूचीप्रमाणे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, अंदाजित खर्च रुपये १,२४,४७,६०१/- आहे. हा खर्च १५ वा वित्त आयोगांतर्गत पाणी पुरवठा (Drinking Water) या करीता उपलब्ध बंधनकारक निधी अंतर्गत प्रस्तावित होणेस, तांत्रिक व प्रशासकीय मंजुरी, निविदा प्रसिध्द करुन दर मागविणेस व काम करुन घेणेस मान्यता मिळणेसाठी उपअभियंता, पाणी पुरवठा विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ७ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**

# जळगाव शहर महानगरपालिका जळगाव

महात्मा गांधी रोड नेहरू चौक ,जळगाव -४२५००१

फोन : (०२५७) २२२२२६१,६२,६३,६४,६५ फॅक्स : (०२५७) २२२२२६०

**MUNICIPAL CORPORATION OF THE CITY OF JALGAON**

Mahatma Gandhi Road, Nehru Chowk, Jalgaon 425001 PH-0257-2222261,62,63,64,65 Fax – 2222260


**सभा क्र.४२** **(महासभा)**

**विषय क्र.:-०८** **प्रशासक ठराव क्र :-३२६** **दिनांक :-१६/०९/२०२५**

**वाचा :-**

१. महाराष्ट्र शासन, नगरविकास विभाग, शासन आदेश क्रमांक : एमसीओ-२०२३/प्र.क्र.२७४/नवि-१४, मंत्रालय, (मुख्य इमारत) मुंबई-३२ दि.१५ सप्टेंबर २०२३ रोजीचा शासन आदेश
२. अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचेकडिल प्रस्ताव जा.क्र./म.बा.क./५२/२०२५-२६ दि.१५/०९/२०२५
३. उपायुक्त यांचा दि.१५/०९/२०२५ चा अभिप्राय
४. मुख्य लेखापरिक्षक यांचा दि.१५/०९/२०२५ चा अभिप्राय
५. आयुक्त यांचा दि.१५/०९/२०२५ चा अभिप्राय.

**विषय :-** सन २०२५-२६ या शालेय शैक्षणिक वर्षाकरीता जळगांव शहर महानगरपालिका संचलित सेमी इंग्रजी व मराठी माध्यमाच्या बालवाडीतील बालकांना पुरक पोषण आहार पुरविणे बाबत.

---

वाचा क्र.१ व अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांचा वाचा क्र. २ ते ५ मधील प्रस्तावानुसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार प्रशासक, जळगांव शहर महानगरपालिका यांना प्राप्त झालेल्या अधिकारानुसार असा ठराव करण्यात येत आहे की,

म.न.पा. संचलित बालवाडीतील बालकांना पोषण आहार पुरविण्याची निविदा सन २०२४-२५ या शैक्षणिक सत्राकरीता नव्याने ई-निविदा प्रस्तावित करण्यास व त्यासाठी होणाऱ्या खर्चास महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार जळगांव म.न.पा. महासभा / प्रशासक ठराव क्र. २९० दिनांक ०१/०८/२०२५ अन्वये expression of interest या Head खाली नवीन निविदा प्रक्रिया राबविणेस व त्याचे प्रसिध्दीचे खर्चास मंजुरी देण्यात आली आहे.

त्यानुसार प्रस्तुत प्रकरणी महासभा / प्रशासक ठराव क्र. २९० दिनांक ०१/०८/२०२५ नुसार म.न.पा. संचलित सेमी इंग्रजी माध्यमाच्या व मराठी माध्यमाच्या बालवाडीतील बालकांना सन २०२५-२६ या शैक्षणिक सत्राकरिताचे कालावधीत शासन पत्र क्र. शापोआ-२०२२/प्र.क्र.६४/एस.डी. ३ दिनांक १३ मे २०२२ व महाराष्ट्र शासन शालेय पोषण आहार योजना स्वतंत्र कक्ष प्रा.शिक्षण/संचालनालय महाराष्ट्र पुणे/प्र.क्र./क.स्व./मसुदा /२०२२-२३/१११७ दि.१३ मे २०२२ व एकात्मिक बालविकास सेवा योजनेतंर्गत राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागाचे शासन निर्णय याचिका / २०१९/प्र.क्र.५/का-५ दिनांक ०३ एप्रिल २०१९ अन्वये पोषण आहार दर रू.८.०० पैसे मात्र नुसार शासकीय शालेय पोषण आहार अंतर्गत ३ ते ६ वयोगटातील बालकांना ५०० उष्मांक व १२ ते १२५ ग्रॅम प्रथिनेयुक्त आहारासाठी प्रती बालक प्रती दिन रु.८.०० मात्रचा आहाराचा दर विहित करण्यात आलेल्या दराप्रमाणे उक्त कालावधीकरीता पोषण आहार पुरविणे कामी नियमाप्रमाणे कमी कालावधीची expression of interest या Head खाली नवीन निविदा काढुन त्याप्रमाणे महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर ई-निविदा सुचना क्र.६१०/२०२५ प्रमाणे सदरची ई-निविदा दि.०६/०८/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली.

सदरची ई-निविदा सुचना क्र. ६१०/२०२५ दिनांक ०६/०८/२०२५ ची दै. दिव्य मराठी या वृत्तपत्रात दिनांक ०७/०८/२०२५ रोजीच्या वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आलेली होती. सदरील ई-निविदा सुचना क्र. ६१०/२०२५ निविदा भरण्यासाठी दि.०६/०८/२०२५ ते दिनांक १२/०८/२०२५ पर्यंत मुदत देण्यात आलेली होती. त्या अनुषंगाने एक निविदाधारक यांनी expression of interest या Head खाली सहभाग नोंदविला असल्याने महाराष्ट्र शासनाच्या www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिसुन येत आहे.

तथापि त्यानुसार सहभागी ई-निविदाधारकाची निविदा ही Expression Of Interest (स्वारस्याची अभिव्यक्ती) या हेडखाली प्राप्त झालेली असल्याच्या अनुषंगाने :- E.O.I. यामधील निकष 4.7 "स्वारस्याची अभिव्यक्ती अर्ज प्रक्रिया प्रारूपामध्ये नमुद करण्यात आलेल्या सर्व निकषांनुसार पात्र झालेल्या सर्व संस्थांच्या कागदपत्रांची छाननी करावी व गुणांक तक्त्यानुसार गुण द्यावे. ज्या ठिकाणी गरजेप्रमाणे व कमी अर्ज प्राप्त झालेले आहेत तेथे सर्व पात्र संस्थांना कामाचे वाटप करावे. ज्या ठिकाणी गरजेपेक्षा जास्त अर्ज प्राप्त होतील तेथे गुणांकनाप्रमाणे किमान 60 पेक्षा जास्त गुण मिळविणाऱ्या संस्थांना केंद्रीय

स्वयंपाकगृहाचे काम विद्यार्थी / शाळा संख्येनुसार पारदर्शक पध्दतीने विभागुन देण्याचे अधिकार आयुक्त महानगरपालिका, मुख्य अधिकारी नगरपालिका यांना राहतील."

तरी Expression Of Interest (स्वारस्याची अभिव्यक्ती) या हेडखालील निकषानुसार प्राप्त झालेली एकमेव ई-निविदाधारकाचा लिफाफा उघडणेस व सदरील निविदाधारकाच्या दस्तऐवजांची छाननी करणेस व त्याप्रमाणे गुणांकन तक्ता तयार करणेस निविदा समितीने विभागाची गरज पाहता विभागाने पुढील कार्यवाही करण्यास हरकत नाही. चे अभिप्रायाचे अनुषंगाने दिनांक १५/०९/२०२५ रोजी मान्यता प्रदान केली. दिनांक १५/०९/२०२५ रोजी निविदा समितीच्या मान्यतेने E.O.I. (स्वारस्याची अभिव्यक्ती) या मधील निकष ४.७ नुसार प्राप्त झालेले लोकशाही महिला गृहउद्योग सह. सोसा. जळगांव एकमेव निविदाधारक आहे.

त्या अनुषंगाने सदर निविदा प्रक्रियेतील एकमेव E.O.I. या हेडखालील सहभागी निविदाधारक लोकशाही महिला गृहउद्योग सह. सोसायटी जळगांव यांनी दिलेल्या दस्तऐवजांचा व त्याप्रमाणे त्यांचा गुणांकन तक्ता तयार करण्यात आलेला आहे. तो प्रकरणी संलग्न असुन त्यानुसार गुणांकन तक्ता पाहता लोकशाही महिला गृहउद्योग सहकारी सोसायटी जळगांव यांनी या निविदेतील अटी शर्तीप्रमाणे व निविदेतील मागणी दस्तऐवजांप्रमाणे पुर्ण दस्तऐवज ऑनलाईन सबमीट करून त्याची त्यांनी पुर्तता केलेली आहे. गुणांकन तक्ता पाहता लोकशाही महिला गृहउद्योग सह. सोसायटी जळगांव यांना एकुण ८४ गुण प्राप्त झालेले आहेत.

त्यानुसार ई-निविदा सुचना क्र. ६१०/२०२५ नुसार सदर निविदेतील निविदाधारक लोकशाही महिला गृहउद्योग सह. सोसा. जळगांव यांची निविदा मंजुर होणेस व त्याप्रमाणे त्यांना एकात्मिक बालविकास सेवा योजनेतंर्गत राज्य शासनाच्या महिला व बालविकास विभागाचे शासन निर्णय याचिका / २०१९/ प्र.क्र.५/का-५ दिनांक ०३ एप्रिल २०१९ अन्वये पोषण आहार दर रू.८.०० पैसे मात्र नुसार शासकीय शालेय पोषण आहार अंतर्गत ३ ते ६ वयोगटातील बालकांना ५०० उष्मांक व १२ ते १२५ ग्रॅम प्रथिनेयुक्त आहारासाठी प्रती बालक प्रती दिन रू.८.०० मात्रचा आहाराचा दर विहित करण्यात आलेल्या दराप्रमाणे उक्त कालावधीकरीता पोषण आहार पुरविणे कामी कार्यादेश देणेस व त्या अनुषंगाने सदरील बालवाडीतील बालकांना पुरक पोषण आहार पुरवठ्याच्या बिल अदायगीचा खर्च हा सन २०२५-२६ च्या म.न.पा. अंदाजपत्रकातील महिला व बालकल्याणाच्या लेखा शिर्षकाखालील तरतुदीतुन करणेस तसेच त्या अनुषंगाने त्यांची संविधा करणे कामी महासभा / प्रशासक यांची मान्यता मिळणेसाठी अधिक्षक, महिला व बालकल्याण विभाग यांनी प्रस्ताव सादर केलेला आहे.

उपरोक्त प्रस्तावास वाचा क्र.१ ते ५ नूसार तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ४५२(अ) मधील तरतुदीनुसार मंजूरी देण्यात येत आहे.

विभागाने वैधानिक कार्यवाही करावी व लेखा परिक्षणात आक्षेप तसेच कायदेशिर अडचणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**(ज्ञानेश्वर ढेरे)**
**प्रशासक**
**जळगांव शहर महानगरपालिका,जळगांव**